# **कधी गिरिधर कधी चक्रधर**

ॐ नमो नारायणा ओम नमो नारायणा
कधी गिरिधर कधी चक्रधर
दीनाला तारशी दानवा मारशी
सुरेल मुरलीधर असा नारायण...

कधी माखन चोर कधी नीलकांत
विषय पचविले ऐसे जैसे नवनीत
प्रेमळ गोपाळ असा नारायण...

कधीच द्वारकाधीश कधी बनवारी
राहशी आनंदाने महाली कुटिरी
सकलांचा सारथी असा नारायण...

आहे तू अनादी आहे तू अनंत
तरी काळापुढे करशी समर्पण
सुंदर लीलाधर नारायण..